६-७० २८-४-२०२२ आ.क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २८/०४/२०२२

# प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

**०१.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ मधील तरतुदीअन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील काही इमारतीना धोकादायक घोषित करण्यात आलेले आहे. सदर इमारतीतील रहिवाशांना महापालिकेकडून वेळोवेळी अधिनियमातील तरतुदीन्वये बजावणी करण्यात आलेली आहे. तथापी, काही धोकादायक इमारतीमध्ये अजूनही नागरिक वास्तव्यास आहेत. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवित व वित्तहानी झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणा-या संबंधीत नागरिकांची राहील, त्याकरिता महापालिका जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**०२** सदर "धोकादायक/अतिधोकादायक" घोषित करण्यात आलेल्या इमारतीची प्रभाग समिती निहाय यादी उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या संकेतस्थळावर List of Dangerours Buildings या शिर्षकाखाली उपलब्ध असून नागरिक आपली इमारत धोकादायक/अतिधोकादायक घोषित केलेल्या यादीमध्ये आहे किंवा नाही याची खात्री करु शकतात.

**०३.** शहरातील सन २००८ पूर्वीच्या असलेल्या किंवा यानंतरच्या कालावधीच्या तथापि तेथील रहिवाश्यांना इमारतीच्या सुस्थितीबाबत शंका असल्यास अशा इमारतीतील रहिवाश्यांनी तात्काळ मान्यताप्राप्त व योग्य अर्हताधारक अशा Qualified Structural Engineer (ज्याची अर्हता तक्ता अ मध्ये नमुद केली आहे किंवा महापालिकेच्या पॅनल वरील Structural Engineer यांचमार्फत इमारतींची तपासणी (Structural Audit) करुन घेऊन त्याची प्रत महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका येथे सादर करावी.

**i) Graduate in Civil Engineering of recognised Indian or Foreign University and Chartered Engineer or Aasociated Member in Civil Engineering Division of Institution Of Engineers (India) or equivalent Overseas Institution with minimum 3 Years of experience of Structural engineering practice in designing and related field work; or.**
**ii) Post graduate degree in Structural engineering with 2 years' experience; or.**
**iii) Doctorate in structural engineering with 1year experience.**

महापालिकेच्या पॅनलवर नियुक्त केलेल्या संरचनात्मक अभियंत्यांची यादी महापालिकेच्या संकेतस्थळ www.umc.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**वास्तव्यास असणारी इमारत ढोबळमानाने धोकादायक झाली आहे,**
**याबाबत काही प्राथमिक लक्षणे आढळून येतात, ती खालीलप्रमाणे,**

१. इमारतीच्या आर. सी. सी. फ्रेम, कॉलम, बीम, स्लॅब इत्यादीच्या रचनेत बदल होत असल्याचे आढळल्यास उदा.
- इमारतीचे कॉलम झुकल्यासारखे दिसून आल्यास.......
- इमारतीचे बीम झुकल्यासारखे दिसून आल्यास......
- इमारतीची स्लॅब झुकल्यासारखे दिसून आल्यास......
- इमारतीच्या स्लॅबच्या सळया गंजून व प्लास्टर निखळून सळया बाहेर निघाल्याचे दिसून आल्यास......

२. इमारतीच्या तळमजल्याचा भाग खचल्यासारखा दिसून आल्यास.....
३. इमारतीच्या कॉलममधील भेगा वाढत असल्यास दिसून आल्यास.....
४. इमारतीच्या कॉलममधील कॉक्रीट पडत असल्याचे दिसून आल्यास......
५. इमारतीच्या कॉलमचा भाग फुगल्यासारखा दिसल्यास.....
६. इमारतीच्या आर. सी. सी. चेंबर्स (कॉलम, बीम) व विटांची भिंती यातील साधा/भेगा वाढत असल्यास......
७. स्लॅबचे किंवा बीमचे तळमजल्याचे कॉक्रीट पडत असल्यास.....
८. इमारतीच्या गिलाव्यामध्ये (प्लास्टर) मोठया प्रमाणात भेगा असल्यास......
९. इमारतीच्या काही भागात विशिष्ट आवाज होत असल्यास......
१०. इमारतीच्या स्लॅब, बीम, कॉलमच्या भेगामुळे लोखंडी सळयांचा आकार गंजल्यामुळे कमी झालेला असल्यास......

**अशा परिस्थितीत वास्तव्यास असणा-या रहिवाशांनी काय काळजी घ्यावी.**

१. उल्हासनगर महानगरपालिकेच्या २४X७ कार्यरत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाच्या ०२५१-२७२०१४३, २७२०१४९ अथवा टोल फ्री क्रमांक १८००२३३११०१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
२. सदर इमारत तातडीने रिकामी करावी.
३. आजूबाजूच्या इमारतीतील रहिवाशांना देखील सतर्क राहण्यास अवगत करावे.
४. तातडीने तज्ञ आर. सी. सी. तांत्रिक सल्लागार यांना दाखवून प्रॉप्स/टेकू लावण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करावी.

०४. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची जिवित व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्व जण जबाबदार नागरिक म्हणून आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना आपणास टाळता येतील.

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन **डॉ.राजा दयानिधी** (भा.प्र.से) **मा. प्रशासक तथा आयुक्त,** उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

२८/४/२२

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,(वेबसाईड वर प्रसिध्द करणो)
प्रत – मा. प्रशासक तथा आयुक्त यांना माहितीस्तव सादर.